पर्यावर्णीय प्रभाव मूल्यांकन

# कार्यकारीसारांश

## प्रस्तावित साखर कारखाना विस्तार १२५० टन/दिन ते ५००० टन/दिन, सहवीज निर्मिती १५मेगावॅट आणि ६०किलो ली प्रतिदिन आसवानी/ इथेनॉल प्रकल्प

देवनांद्रा, ता. पाथरी , जिल्हा. परभणी, महाराष्ट्र

# श्री रेणुका शुगर्स ली.

**पर्यावरण सल्लागार व प्रयोगशाळा**

IS/ ISO 9001:2015 Certified
MITCON CONSULTANCY & ENGINEERING SERVICES LTD.

**मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनीयरिंग सर्विसेस लि., पुणे**
पर्यावरण व्यवस्थापन आणि अभियांत्रिकी विभाग
क्यू . सि. आई. - एन. ए. बी. इ. टी. मान्यताप्राप्त सल्लागार मान्यता क्रमांक
NABET / EIA / १७२० / RA००७५ डी.आय.सी कार्यालय मागे, कृषी महाविद्यालय परिसर, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५, महाराष्ट्र, भारत, दूरध्वनी: + ९१-२० ६६६८९४००, ४०४,४०६,४०७

# सूची

**१. परिचय** ........ 2
**२. प्रकल्प स्थान** ........ 2
**३. प्रकल्पाची मुख्य वैशिष्ट्ये** ........ 6
**४. प्रक्रिया** ........ 8
**५. पर्यावरणविषयक वर्णन** ........ 9
६. **अपेक्षित पर्यावरण प्रभाव** ........ 11
**७. पर्यावरण निरीक्षण कार्यक्रम** ........ 12
**८. पर्यावरण व्यवस्थापन योजना** ........ 13
**९. पर्यावरण व्यवस्थापन खर्च** ........ 15
**१०. निष्कर्ष व प्रकल्पाचे फायदे** ........ 15

## १. परिचय

श्री रेणुका शुगर्स लिमिटेड (एस.आर.एस.एल) ने १२५० टीसीडी क्षमतेनुसार २००८-२००९ साली ऑपरेशन सुरू केले. विद्यमान युनिट पूर्वी गोदावरी दुधाणा एस.एस.के लि. द्वारे चालवले जात होते आणि १९९२ च्या सुरुवातीस आसवानी बांधण्यास सुरवात केली होती.

एस.आर.एस.एल व्यवस्थापन सध्या अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्याचा विस्तार १२५० टन/दिन ते ५००० टन/दिन, सहवीज निर्मिती १५ मेगावॅट आणि ६० किलो ली./दिन, आसवानी/ इथेनॉल प्रकल्प विस्तार प्रस्तावित करत आहे. प्रस्तावित ६० किलो ली./ दिन, आसवानी मध्ये किण्वन, बहुदा दाब डिस्टिलेशन सिस्टम, बायो डायजेस्टर, बाष्पीभवन आणि बायो-कंपोस्टिंग कार्यरत होतील. साखर कारखान्याद्वारे, आसवानी विभागास मळी पुरवली जाईल, तर को-जनरेशन, बॉयलर आणि टर्बाईन प्रस्तावित साखर आणि डिस्टिलरी प्लांटला स्टीम व वीज पुरवतील.

## २. प्रकल्प स्थान

प्रस्तावित प्रकल्पाचे विस्तारीकरण विद्यमान कारखाच्या परिसरात असेल. कारखाना सर्वे क्रमांक २७६, २७७, २७८, २७९, २९८ आणि ३२३ गाव देवनंद्रा, तालुका पाथरी, परभणी जिल्हा, महाराष्ट्र येथे स्थित आहे. प्रकल्प भौगोलिकदृष्ट्या रेखांश १९°१६'१०.५३ " उत्तर, अक्षांश ७६°२६'१३.६०" दक्षिण येथे स्थित आहे व समुद्रसपाटी पासूनची उंची ४४० मी इतकी आहे.




आकृती १: सामान्य स्थान **दर्शक** नकाशा




आकृती २: प्रकल्पाचे गूगल चित्र




आकृती ३: कारखान्याची छापील मांडणी





**विद्यमान साखर कारखाना**





**जुनी आसवानी**



**मोल्यासेस टॅंक**



**स्प्रे पौंड**

**आकृती ४: विद्यमान फॅक्टरीची छायाचित्रे**

## ३. प्रकल्पाची मुख्य वैशिष्ट्ये

**तक्ता १: प्रकल्पाची आणि पर्यावरणविषयक संक्षिप्त माहिती**

| **घटक** | वर्णन |
|---|---|
| उत्पादने | अस्तित्वात असलेली गाळप क्षमता: १२५० टन/दिन<br>प्रस्तावित: ५००० टन/दिन<br>प्रस्तावित वीज निर्मिती १५ मेगावॅट<br>आसवानी: ६० किलो ली /दिन (ईएनए /आरएस/एए/इथॅनॉल) |
| साखर ५००० (टन प्रति दिन) | ५२० |
| बगॅस (टन प्रति दिन) | १४०० |
| प्रेस मड (टन प्रति दिन) (४.० %) | २०० |
| मळी (टन प्रति दिन) ५.५ % | २७५ |
| B मळी (६.५ % टन प्रति दिन ) | ३२५ |
| कामकाजाचे दिवस | साखर कारखाना गळीत हंगाम : १६० दिवस<br>सहवीज निर्मिती : १६०- १९० दिवस , आसवानी : २७० दिवस |
| मळीची गरज | मळी २४० टन/दिन |
| धान्य | १६० टन/दिन |
| हंगामात उसाचा रस | १००० टन/दिन |
| पाण्याची आवश्यकता | साखर कारखान्यासाठी ३०० मी³/दिन<br>मळी व उसाचा रस वर आधारित आसवानीसाठी ४७५ मी³/दिन<br>किंवा धान्यावर आधारित आसवानी साठी ६६१ मी³/दिन |
| पाणी स्रोत | गोदावरी नदी ८.२ किमी ( पाणी परवाना मिळवण्याचे काम सुरु आहे) |
| बॉयलर | सध्या अस्तित्वात असलेला साखर कारखान्याचा बॉयलर: ४० टन/ तास आणि नवीन प्रस्तावित १०० टन/ तास (हंगामादरम्यान १०० टन/ तास बॉयलर ऑपरेशनमध्ये असेल आणि गळीत हंगाम नसताना ४० टन/ तास बॉयलर ऑपरेशनमध्ये असेल) |
| टर्बाइन जनरेटर | १५ मेगावॅट |
| डिझेल जनरेटर | सध्या अस्तित्वात असलेला ५०० kVA & नवीन प्रस्तावित १००० |
| इंधन | बगॅस : ११५० टन/दिन<br>कोळसा : ७४५ टन/दिन<br>बायोगॅस : ९७९ मी³/ तास |
| वाफ | साखर कारखान्यासाठी : ८२ टन /तास |

| | |
|---|---|
| | आसवानी साठी १५ टन /तास<br>बॉयलर डीएरिएटर - ३ टन /तास |
| कारखान्यातील एकूण प्रदूषित | साखर कारखाना: ४३० मी$^3$/दिन<br>मळीवर आधारित आसवानी : ११९० मी$^3$/दिन ( स्पेंट वॉश, स्पेंट लीस, कंडेन्सट) किंवा धान्यावर आधारित : १०४० मी$^3$/दिन (स्लोप स्पेंट लीस, कंडेन्सट ) |
| राख | सध्या निर्माण होणारी बगॅस राख: ४.२ टन/दिन<br>प्रस्तावित निर्माण होणारी बगॅस राख : १५.७ टन/दिन |
| ए.टी.पी मधील गाळ | प्रदूषित पाणी व्यवस्थापनामधून निघणारा गाळ हा खत निर्मिती प्रक्रियेमध्ये वापरला जाईल |
| वायू प्रदूषण नियंत्रक उपाय | प्रस्तावित १०० टन/ तास बॉयलर ( चिमणी ची उंची ६५ मी) साठी इलेक्ट्रोस्टॅटिक प्रेसिपिटेटर बसवले जाईल.<br>सध्या अस्तित्वात असलेल्या बॉयलर साठी ४० टन/तास (चिमणी उंची ३३ मी) वेट स्क्रबर हि हवा प्रदूषण नियंत्रण प्रणाली कार्यरत आहे |
| मनुष्य बळ | विद्यमान मनुष्यबळ साखर ८० कुशल आणि अकुशल ४००<br>प्रस्तावित प्रकल्पासाठी कुशल १०० आणि अकुशल १५० |
| एकूण प्रकल्प खर्च | रु. २२७.७१ करोड |
| पर्यावरण व्यवस्थापनाचा भांडवली खर्च | रु.२४.४६ करोड |
| **पर्यावरणाविषयी** | |
| जवळचे गांव | देवनांद्रा १.० किमी पूर्व दिशेस पूर्व |
| जवळचे शहर / शहर | पाथरी ०.७ किमी दक्षिणेस |
| जवळचा राष्ट्रीय महामार्ग | एनएच - २२२ अंबड-मनवथ रस्ता ०.८ किमी. दक्षिणेस |
| जवळचे रेल्वे स्टेशन | रेल्वे स्टेशन परभणी ३५ किलोमीटर, मनवाथ १५ किमी |
| जवळचे विमानतळ | श्री गुरु गोबिंद सिंह विमानतळ ९५ किमी आग्नेयेस |
| १० किमी त्रिज्यामध्ये राष्ट्रीय उद्याने, संरक्षित वन / संरक्षित वन, वन्यजीव अभ्यारण्य, बायोस्फीअर आरक्षित, वाघ / एलिफंट आरक्षित, वन्यजीव कॉरिडॉर इ. | प्रकल्प क्षेत्राच्या १० किमीच्या आत कोणतेही नाही |
| १० ज्यामध्ये नदी/ पाण्याचे स्तोत्र | गोदावरी: पश्चिमेकडे ८.२ किमीवर |

## ४. प्रक्रिया

साखर

साखर कारखान्यांच्या प्रक्रियेतील मुख टप्पे म्हणजे रस काढणे, उकळवणे, क्लॅरिफिकेशन, बाष्पीभवन, क्रिस्टलायझेशन, आणि सेन्ट्रिफ्युगेशन.

**आसवानी**

अल्कोहोल उत्पादनात मुख्यतः खालील दिलेल्या टप्प्यांचा समावेश आहे.

- मळी पुरवठा व त्याचे वजन करणे
- मळी मध्ये योग्य प्रमाणात पाणी मिसळणे
- यीस्ट च्या मदतीने आंबवणे
- ऊर्धपातन प्रक्रियेतून अल्कोहोल

किंवा

**धान्यावर आधारित - आसवानी युनिट**

प्रक्रियेत मुख्यत्वे खालील पाहिऱ्यांचा समावेश आहे

- धान्य साठवण
- धान्याची स्वच्छता, दळणे आणि पीठ हाताळणी
- स्लरी तयार करणे व द्रवीभवन
- सॅकक्रिफिकेशन व फरमेंटशन
- मल्टी प्रेशर डिस्टिलेशन
- ऊर्धपातन प्रक्रियेतून अल्कोहोल

**वीज निर्मिती**

बगॅस बॉयलर मध्ये जाळले जाते. त्यातून तयार होणारी उष्णता हि पाणी उकळण्यासाठी व वाफ तयार करण्यासाठी वापरली जाते. टर्बाईन हे वाफेवर चालते व टर्बाईन जनरेटर चालवतो आणि जनरेटर वीज तयार करतो.

## ५. पर्यावरणविषयक वर्णन

प्रकल्प परिसरातील विविध पर्यावरणीय घटकांचा मार्च २०१९ ते मे २०१९ या कालावधीचा अभ्यास केला गेला. पर्यावरणाच्या मूलभूत अध्ययनासाठी पर्यावरण वन,आणि जलवायू मंत्रालयाने दिलेली मार्गदर्शक तत्त्वे, तांत्रिक ई.आय.ए मार्गदर्शक तत्वे यांचे मार्गदर्शन घेतले.

**तक्ता ३: पर्यावरण निरीक्षणाचे निरीक्षण**

| पर्यावरण गुणधर्म | देखरेख वारंवारता | घटक | निरीक्षण |
|---|---|---|---|
| हवामानशास्त्र | मायक्रोप्रोसेसर आधारित हवामान निरीक्षण स्टेशन सतत ताशी रेकॉर्डिं | वाऱ्याची दिशा | वायव्ये कडून, पश्चिमेकडून व नैऋत्येकडून |
| | | कमाल तापमान | ४४.३ |
| | | किमान तापमान. | ९.६ |
| | | सापेक्ष आर्द्रता | २४ - ८३ % |
| | | पर्ज्यन्य | मासिक एकूण वार्षिक सरासरी ९६२.८ मी मी |
| हवेची गुणवत्ता | ९ स्थाने २४ तासांचे नमुने ३ महिने आठवड्यात दोनदा (मायक्रोग्रॅम घन.मी.) | पी. एम. १० | केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार मर्यादेत |
| | | पी. एम. २.५ | |
| | | सल्फर डायॉक्साईड | |
| | | नायट्रोजन ऑक्साइड्स | |
| पाणी गुणवत्ता (भूजल आणि पृष्ठजल) | हंगामात एकदा (११ ठिकाणी) (भौतिक, रासायनिक आणि जैविक घटक) | पी. एच | ई. कोलाय, पाण्याची काठिण्य पातळी व पाण्यातील घन पदार्थ वगळता सर्व घटक मार्यादेच्या आत आहेत. |
| | | टी डी.एस. | |
| | | सि. ओ. डी. बी. ओ. डी. | |
| | | ई. कोलाय | |
| माती गुणवत्ता | हंगामात एकदा ८ ठिकाणी | माती प्रकार आणि पोत, भौतिकी-रासायनिक गुणधर्म | काळी ते तपकिरी चिकणमाती चांगली पाणी धारण क्षमता आहे, हेवी मेटल प्रदूषणाचे लक्षण आढळले नाही.. |
| ध्वनी तीव्रता | हंगामात एकदा ९ ठिकाणी (डीबी मध्ये ध्वनी पातळी (अ) | दिवसा | ४४.३ - ५५.२ |
| | | रात्री | ३२.२ – ४७.५ |
| जमिनीचा वापर | जमिनीच्या अभ्यासासाठी | माहिती आणि जमीन वापर वर्गीकरण | बहुतांश जमीन कृषी जमीन |

| पर्यावरण गुणधर्म | देखरेख वारंवारता | घटक | निरीक्षण |
|---|---|---|---|
| | प्रोजेक्ट क्षेत्रावर एकदा भेट | | |
| भूविज्ञान व हैड्रोजओलॉजि | अभ्यास काळात एकदा | प्रोजेक्ट क्षेत्राचे भूविज्ञान व हायड्रोलॉजि | बेसाल्टीक लाव्हा प्रवाहांमुळे, डेक्कन ट्रॅप वरील भूजल मुखत्वे वेअथेरेड व फ्रॅक्चर्ड भागाखाली ५-१० मी. खोलीवर आढळते. गाळाची माती फार थोड्या प्रमाणात आढळते. |
| जैविक पर्यावरण | १० किमी त्रिजेच्या अभ्यास क्षेत्रात | वनस्पती व प्राणि ची माहिती गोळा करणे. | *बाभूळ, लिंब, तरवड, काशीद,* ताम्रशिंबी, वड, पिंपळ, उंबर . |
| | | | वेडा राघू, खाटीक, मैना, ब्राह्मणी मैना, पोपट ई. |
| सामाजिक-आर्थिक परिस्थिती | १० किमी त्रिजेच्या अभ्यास क्षेत्रात | सामाजिक-आर्थिक माहिती गोळा करणे. | स्वच्छतेच्या सुविधा असमाधानकारक आहेत, वीज पुरवठा सुविधा जवळजवळ सर्व गावात उपलब्ध आहेत, पाणी पुरवठा आहे, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उप केंद्र प्राथमिक आरोग्य उपलब्ध आहे. |








**आकृती ५: पर्यावर्णीय अभ्यासा दरम्यान घेतलेली छायाचित्रे**

६. पर्यावरणांवर होणारे अपेक्षित परिणाम

**तक्ता ४: अपेक्षित परिणाम**

| पर्यावरणविषयक पैलू | अपेक्षित परिणाम |
|---|---|
| **वायू पर्यावरण** | प्रक्रियेतून निघणारे गॅसेस, वाहनातून व मालवाहतूक निघणारे धूलिकणांचे व चिमणीतून निघणाऱ्या धुराचे योग्य नियंत्रण न केल्यास वायू प्रदूषणात पातळीत वाढ होण्याची संभावना आहे |
| **पाणी पर्यावरण** | सांडपाण्याची योग्य विल्हेवाट न लावल्यास पाण्याचे प्रदूषण होऊन त्याचे मानवी आरोग्यावर व सभोवतालच्या पर्यावरणावर परिणाम होऊ शकतात. . |
| **जमीन पर्यावरण** | घातक / घनकचरा कचराच्या अयोग्य विल्हेवाटी मुळे जमिनीवर विपरीत परिणाम होऊन, जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होईल |
| **जैविक पर्यावरण** | कारखान्यातून कोणताही प्रकारचे सांडपाणी, व इतर प्रदूषित पाणी बाहेर सोडले जाणार नाही. हरित पट्टा विकसित करण्यात येईल |
| **सामाजिक पर्यावरण** | पायाभूत सुविधा विकास संदर्भात शैक्षणिक पातळी, आरोग्य सुविधा इ. क्षेत्राचा विकास होईल |
| **आर्थिक पर्यावरण** | महसूली उत्पन्न म्हणून प्रदेश आणि देशातील अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम. |

| | |
|---|---|
| **ध्वनी पर्यावरण** | प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये ध्वनी पातळी त किंचित वाढ होईल. |
| **व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता** | वैयक्तिक संरक्षण उपकरणे न वापरल्यास, योग्य कार्यप्रणाली न वापरल्यास, तसेच यंत्रांची नीट निगा न राखल्यास आरोग्य धोक्यात येऊ शकते |

## ७. पर्यावरण निरीक्षण व देखरेख कार्यक्रम

**तक्ता ५: पर्यावरण निरीक्षण व देखरेख कार्यक्रम**

| पर्यावरण पैलू | घटक | वारंवारता | पद्धती |
|---|---|---|---|
| पिण्याचे पाणी | पिझोमेट्रिक वेल पाणी परीक्षण व कारखान्यातील पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेचे परीक्षण. | मासिक, त्रितिय पक्ष लॅबोरेटरी निरीक्षण | आय. एस. १०५००:२०१२ |
| औद्योगिक वापराचे पाणी | पाण्याचे सर्वसामान्य मानके | मासिक, त्रितिय पक्ष लॅबोरेटरी निरीक्षण | मानक पद्धती नुसार |
| औद्योगिक सांडपाणी | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार | मासिक, त्रितिय लॅबोरेटरी निरीक्षण | मानक पद्धती नुसार |
| हवा | अतिरिक्त मापदंड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नुसार | कारखाना व परिसरातील दोन-तीन ठिकाणी हवेचे परीक्षण करावे | आ एस : ५१८२ |
| कामाची जागा देखरेख | ध्वनी, व्हीओसी, तापमान पातळी | मासिक, त्रितिय लॅबोरेटरी निरीक्षण | - |
| चिमणी परीक्षण | अतिरिक्त मापदंड, व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि निवडणूक आयोगाने आदेशावरून | मासिक ३ पक्षाची देखरेख | आ एस: ५१८२. |
| ध्वनी परीक्षण | डेसिबल ध्वनी पातळी | मासिक, त्रितिय पक्ष लॅबोरेटरी निरीक्षण | मासिक |
| आरोग्य तपासणी | कारखाना कायदा व इतर व वैद्यकीय तरतुदी (रोजगारा पूर्वी व नंतर). | प्रकल्प कार्य काळात वार्षिक. | -- |

## ८. पर्यावरण व्यवस्थापन योजना

प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणामांचा प्रभाव कमी करण्यासाठी खालील उपाय योजना करण्यात येतील

**तक्ता ६: विविध पर्यावरणविषयक परिणामांच्या उपाय योजना**

| पर्यावरण विशेषता | उपाययोजना |
|---|---|
| हवा प्रदूषणाच्या उपायोजना | • धूलिकणांच्या उत्सर्जनासाठी ईएसपी ९९% कार्यक्षमता देण्यात येईल.<br>• संपूर्ण प्रक्रिया बंद स्थितीत चालविली जाईल जेणेकरुन व्हीओसी उत्सर्जन कमी होण्याची शक्यता टाळता येईल.<br>• सर्व डी.जी. सेट निकडीच्या प्रसंगी वापरले जातील.<br>• बॉयलर आणि डीजी ला पुरेशी स्टॅकची उंची प्रदान केली जाईल |
| प्रदूषित पाण्याचे व्यवस्थापन | • प्रस्तावित आसवानी "झिरो लिक्विड डिस्चार्ज" तंत्रज्ञानावर आधारित असेल.<br>• एकूण स्पेंटवॉश ~६०० घन मी. असेल व त्यासाठी बायोगॅस आणि त्यानंतर मल्टी-इफेक्ट बाष्पीभवन (एमईई) व बायो कम्पोटींगचे पालन केले जाते. आसवानी जेव्हा धान्यावर आधारित असेल तेव्हा त्यांतून निघणाऱ्या प्रदूषित पाण्यापासून डीडीजीएस बनवले जाईल, जे जनावरांसाठी अत्यंत पौष्टिक व प्रथिने युक्त खाद्य म्हणून त्याची विक्री केली जाईल.<br>• साखर कारखान्यातून निघणाऱ्या प्रदूषित पाण्यावर ई. टी. पी. मधून प्रक्रिया केली जाईल व प्रक्रिया केल्यानंतर पाणी कारखाण्यातील हरितपट्टा विकासासाठी व सिंचनासाठी वापरले जाईल. सांडपाण्याचे शोषखडया द्वारे नियंत्रण केले जाईल. |
| ध्वनी प्रदूषण व्यवस्थापन | • ध्वनी प्रदूषणाला आळा बसण्यासाठी सर्व प्रक्रिया बंदिस्त जागेत केला जाईल<br>• संचांना ध्वनिनियंत्रण आवरण प्रदान केले जाईल.<br>• कारखान्याभोवती हरित पट्ट्याचा विकास केला जाईल, ज्यामुळे ध्वनी प्रदूषणास आळा बसण्यास मदत होईल. |
| दुर्गंधीचे व्यवस्थापण | • उत्तम कार्य पद्धती व्यवस्थापान करून दुर्गंध नियंत्रीत केला जाईल.<br>• किण्वना दरम्यान तापमान नियंत्रीत करून यीस्ट चे निष्कार्य कींवा मृत होणे टाळले जाईल.<br>• कुजवणाऱ्या सुक्षमजीवांची गटारांमध्ये होणारी वाढ वेळोवेळी नियंत्रण केली जाईल व त्यासाठी जैविक रासायनांचा वापर केला जाईल. |

| पर्यावरण विशेषता | उपाययोजना |
|---|---|
| घन आणि घातक कचरा व्यवस्थापन | • अवशिष्ट तेल / घातक कचरा फार कमी प्रमाणात असेल व तो इंधन म्हणून बॉयलर मध्ये वापरला जाईल.<br>• सी. पी. यू मधून निघणारा गाळ तसेच घनकचरा घातक नसल्याने खत म्हणून उपयोगात येईल. |
| वाहतूक व्यवस्थापन | • धुळी कणांचे उतसर्जन कमी करण्यासाठी वाहतूक उपकरणांना आच्छादन केले जाईल.<br>• चांगली वाहतूक व्यवस्थापन प्रणाली विकसित आणि तिची अंमलबजावणी केली जाईल. |
| ग्रीन बेल्ट विकास / वृक्षारोपण | केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) निर्धारित केलेल्या नियमानुसार वृक्षारोपण केले जाईल. |
| व्यवसाईक पर्यावर्णीय जबाबदारी | रु ३.४१ कोटी रुपयांची तरतूद (एकूण प्रकल्प खर्चाच्या १.५ %) येत्या ३ वर्षांत सामाजीक पर्यावरणीय जबाबदारी अंतर्गत (कॉर्पोरेट एन्विरॉन्मेंटल रेस्पॉन्सिबिलिटी ) केली जाईल. |
| व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता | • कामगारांच्या आरोग्याची वेळोवेळी तपासणी करण्यास कारखाना कटीबद्ध आहे.<br>• कारखाना चालू असताना सर्व सुरक्षा नियमांचे पालन केले जाईल.<br>• सर्व सुरक्षा नियमांची वेळोवेळी कार्यशाळा घेतली जाईल.<br>• सर्व कर्मचाऱ्यांना स्वयं रक्षक उपकरणे दिली जातील. |

## ९. पर्यावरण व्यवस्थापन खर्च

तक्ता ७: पर्यावरण व्यवस्थापन खर्च

| क्र. | वर्णन | भांडवली किंमत (लाख रुपये) | आवर्ती खर्च (लाख रुपये) |
|---|---|---|---|
| १. | वायू प्रदूषण नियंत्रण | १५० | १० |
| २. | साखर ईटीपी | १५० | ५ |
| ३. | घन कचरा व्यवस्थापन | - | ७ |
| ४. | पर्यावरण निरीक्षण आणि व्यवस्थापन | ४० | ३ |
| ५. | पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन | २५ | ४ |
| ६. | व्यावसायिक आरोग्य | २० | ४.८ |
| ७. | हरित पट्ट्याच्या विकास | १५ | ३.५ |
| ८. | एकूण | ४०० | ३७.३ |

## १०. निष्कर्ष व प्रकल्पाचे फायदे

- ऊस लागवडीमध्ये क्षेत्र समृद्ध आहे आणि निश्चित वार्षिक ऊस उपलब्धतेसाठी पुरेश्या सिंचन सुविधा आहेत.
- नियोजित कारखान्याच्या विस्तारणामुळे कारखान्यास आर्थिक स्थिरता मिळेल व त्याचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे परिसरातील लोकांना होतील.
- ऊर्जेच्या संवर्धन आणि परिचालन मूल्यात झालेली घट त्यामुळे ऑपरेशनचा नफा वाढतो.
- सहवीज निर्मितीमुळे बगॅसच्या सुरक्षित साठवण आणि वेल्हेवाटीवरचा खर्च वाचवितो.
- कारखान्यामुळे परिसरातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
- व्यापारी क्षेत्रात वाढ होऊन त्यास संलग्न व्यवसायांमध्ये वाढ होईल.
- कारखान्यामुळे कोणत्याही प्रकारचे पर्यावरणाचे प्रदूषण होणार नाही, याची काळजी कारखान्याचे व्यवथापन घेईल.
- कारखान्यामुळे कोणत्याही प्रकारची वनस्पती व प्राणी यांची हानी अपेक्षित नाही
- नियोजित कारखाना विस्तारण्यासाठी अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण उपकरणांचा वापर करण्याचे योजिले आहे.
- विद्यमान व नियोजित कारखान्याच्या विस्तार पर्यावरण पूरक होईल यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील.
- पर्यावरणाचे धोके टाळण्यासाठी वैयक्तिक संरक्षक उपकरणे, सुरक्षेची खबरदारी, आणीबाणी योजना आणि आपत्ती व्यवस्थापन योजना केली जाईल.